


परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 108 | बुधवार दि. 13 मे 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060



# नागरिकांमध्ये अस्वस्थता काळजी वाढली

## काटकसरीच्या घोषणेनंतर शरद पवार यांचा मोदींना सल्ला



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा कमी वापर करण्याचा, खाद्यतेल कमी खाण्याचा तर सोने आणि चांदी खरेदी न करण्याचा सल्ला दिला. त्यावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मोठे वक्तव्य केले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा कमी वापर करण्याचा, खाद्यतेल कमी खाण्याचा तर सोने आणि चांदी खरेदी न करण्याचा सल्ला दिला. त्यावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मोठे वक्तव्य केले आहे. त्यांनी एक्स हँडलवरून ट्वीट केले आहे. पंतप्रधान मोदी यांना त्यांनी मोठे आव्हान केले आहे. त्यांनी जनतेच्या मनात काय सुरु आहे, याविषयीची कल्पना पीएम नरेंद्र मोदी यांना या ट्वीटच्या माध्यमातून करून दिली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर राजकीय विरोधक त्यांच्यावर तुटून पडले आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी या भूमिकेवर सडेतोड मत मांडलं आहे. "मध्यपूर्वेतील अस्थिर आणि युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी काही घोषणा केल्या. त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. या घोषणा अचानक करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्र तसेच गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ही बाब निश्चितच काळजी निर्माण करणारी आहे." असे ट्वीट पवार यांनी केले आहे.या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रधानमंत्र्यांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करावी. राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्व पक्षीय नेत्यांना विश्वासात पान 3 वर

# शिवसेना जिल्हाप्रमुख पदासाठी धनंजय पापा सोळंके यांची निवड करावी :- कैलास कावरे



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) धनंजय पापा सोळंके हे गेल्या वर्षांपासून शिवसेनेचे एकनिष्ठ शिलेदार आहेत शाखाप्रमुख पदापासून ते शिवसेनेच्या शहर प्रमुख पदापर्यंत अनेक पद सांभाळले असून माजलगाव नगर परिषदेचे शिवसेनेच्या धनुष्यबाणावर नगरसेवक सुद्धा ते झालेले आहेत पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात, निवडणुकीत, शाखा बांधणीत आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांवर हे आघाडीवर राहिले आहेत. उदा: कोविड काळात केलेले काम, शेतकरी प्रश्न, स्थानिक समस्या सोडवण्यासाठी केलेली अनेक आंदोलनामध्ये हेराहेरीने सहभाग घेतलेला असून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षांच्या माध्यमातून अनेक रुग्णांना त्यांनी भरीव अशी मदत मिळवून दिली आहे अशा तरुण तडफदार शिवसेनेच्या कट्टर कार्यकर्त्याला जिल्हाप्रमुख पदावर बसून काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी परळी युवा सेनेचे विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी केली आहे पुढे निवेदनात म्हंटले आहे की सत्तेच्या काळातही आणि पक्षावर संकट आले तेव्हाही यांनी बाळासाहेबांचे विचार धर्मवीर आनंद दिघे साहेब व एकनाथ शिंदे साहेब खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर निष्ठा ठेवून आहेत बीड


जिल्ह्याची गरज सध्याची स्थिती जिल्ह्यात पक्ष बांधणी थांबली आहे. जुने शिवसैनिक नाराज आहेत. बूथ लेव्हलपर्यंत पोचणारा चेहरा नाही धनंजय पापा सोळंके हा जमिनीवरचा कार्यकर्ता आहे. प्रत्येक तालुका, गाव येथे यांची ओळख आहे. युवकांना जोडण्याची ताकद आहे. सामान्य शिवसैनिक यांच्यात स्वतःचा नेता पाहतो परिणामी यांच्या निवडीने जिल्ह्यातील मरगळ झटकली जाईल. येणाऱ्या निवडणुकांमध्ये शिवसेनेची ताकद 10 पटीने वाढेल. हा निर्णय म्हणजे कट्टर शिवसैनिकांचा सन्मान असेल माननीय एकनाथजी शिंदे साहेबांनी, संसद रत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब , व शिवसेना सचिव संजय मोरे साहेब यांनी जिल्ह्यातील हजारो शिवसैनिकांच्या भावनेचा आदर करून धनंजय पापा सोळंके यांची तात्काळ जिल्हाप्रमुख पदी निवड करावी कार्यकर्त्यांचा आवाज ही केवळ आमची मागणी नाही, तर तळागाळातील प्रत्येक निष्ठावंत शिवसैनिकाची इच्छा आहे. एकाच व्यक्तीला पाच वर्ष पदावर असूनही पक्ष संघटना



न वाढविणाऱ्या पदाधिकाऱ्यांना घरचा रस्ता दाखवावा जर निष्ठावंत कार्यकर्त्याला डावलले गेले तर जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये चुकीचा संदेश जाईल. आम्ही लोकशाही मार्गाने आमची मागणी लावून धरत आहोत असेही कैलास कावरे यांनी म्हटले आहे खुर्चीसाठी नाही, तर बाळासाहेबांच्या विचारांसाठी लढणारा कट्टर शिवसैनिक जिल्हाप्रमुख व्हावा अशी संबंध जिल्ह्यातील शिवसैनिकांची व अनेक पदाधिकाऱ्यांची एकमुखी मागणी आहे असे कैलास कारे यांनी प्रसिद्धी माध्यमात म्हटले आहे साहेब हा आपला परिवारातील घरचा विषय आहे, साहेब योग्य निर्णय घेतील शिवसैनिकांसहित पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी घेऊन शिवसेना पक्षांच्या वरिष्ठांना निवेदन देणार असल्याचेही या वेळी युवा सेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी प्रसिद्धी माध्यमांना कळवले आहे

# आज ठळक

## अल्पवयीन मुलीच्या गर्भपात प्रकरणी डॉ. जाजूसह एका परिचारिकेवर गुन्हा




माजलगाव : अल्पवयीन भोळसर मुलीवर झालेल्या अत्याचारात ती गर्भवती होती याची माहिती येथील जाजू हॉस्पिटलच्या संचालिका यांच्यासह तेथील परिचारिकेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर गर्भपात करणाऱ्या डॉक्टरला अद्यापही पोलिसांनी अटक केलेली नाही. माजलगाव तालुक्यातील एका गावातील 14 वर्षीय मुलीचे पोट दुखत असल्याने तिला माजलगाव येथील एका खासगी रुग्णालयात कुटुंबियांनी तपासणीसाठी नेले होते. सोनोग्राफी तपासणीत मुलगी दोन महिन्यांची गर्भपती असल्याचे बाब समोर आली. त्यानंतर मुलीच्या वडिलांनी तिला माजलगाव शहरातील जाजू हॉस्पिटल या ठिकाणी घेऊन गेले होते. सदरील मुलगी अल्पवयीन व गर्भवती असल्याची माहिती या हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. उर्मिला जाजू यांना माहीत असताना त्यांनी आरोग्य विभाग व पोलिसांना ही बाब कळवणे आवश्यक होते परंतु त्यांनी ही बाब लपवली. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर या रुग्णालयातील एका परिचारिकेने डॉ. नर्गिस जावेद शेख यांचा नंबर दिला होता त्यामुळे या परिचारिकेवर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील गर्भपात करणाऱ्या डॉ. नर्गिस जावेद शेख या जिल्हा रुग्णालयात रक्तदाब वाढल्यामुळे ऍडमिट करण्यात आले होते त्या ठिकाणी त्यांच्यावर पोलिसांचा पहारा आहे. चार दिवसानंतर देखील त्यांना अटक दाखवण्यात आली नसल्याचे देखील पोलिसांकडून सांगण्यात आले. अल्पवयीन मुलीच्या गर्भपात प्रकरणी तिचे वडील , पान 3 वर

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर पहिलीच मोठी घटना

### सुनील तटकरेंनी घेतलेली भेट किती महत्त्वाची



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मंगळवारी सायंकाळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. ही भेट राजकीय नव्हती, बऱ्याच दिवसांपासून त्यांची तब्येत ठीक नसल्यामुळे त्यांची विचारपूस करण्यासाठी भेट घेतल्याचे तटकरे यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर ही पहिलीच भेट असण्याची शक्यता आहे.


गेल्या काही दिवसांपासून पवार यांची तब्येत ठीक नसल्यामुळे भेटीसाठी त्यांची वेळ मागितली पान 3 वर

# घराच्या बाहेर पडणं टाळा, IMD च्या नव्या इशाऱ्याने चिंता वाढली



महाराष्ट्रात गेले काही दिवस अवकाळी पावसानं हजेरी लावली, त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून थोडा दिलासा मिळाला, वातावरणात गारवा निर्माण झाला. मात्र आता पुन्हा एकदा चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे महाराष्ट्रात पुन्हा एकदा उष्णतेची लाट येणार असल्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. नागपूर हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार विदर्भात पुढील काही दिवसांमध्ये 2 ते 3 अंशांनी तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. अकोला जिल्ह्यात सोमवारी 45 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. पान 3 वर

## परळीत 13 मे रोजी भव्य 'सामूहिक सुदर्शन होम' आणि सत्संगाचे आयोजन




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त आणि पूज्य श्री श्री रविशंकर जी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बुधवार, दिनांक 13 मे 2026 रोजी परळीत भव्य 'सामूहिक सुदर्शन होम'चे आयोजन करण्यात आले आहे. वैदिक धर्म संस्थानतर्फे देशभरात आयोजित केल्या जाणाऱ्या 70 सुदर्शन होमांचाच हा एक भाग आहे.

सामूहिक सुदर्शन होम विधी बुधवार, दिनांक 13 मे 2026 रोजी परळी वैजनाथ येथील 'श्री श्री ज्ञान मंदिर' (वैद्यनाथ मंदिर पूर्व दिशा, पार्किंग लॉटच्या मागे) येथे दुपारी पान 3 वर

# परळीत महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे वीज खंडित

### जनता त्रस्त, महादेव गंगणे पाटील यांचा तीव्र संताप



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) शहरात महावितरणच्या (MSEDCL) अत्यंत ढिसाळ आणि भोंगळ कारभारामुळे सातत्याने वीज पुरवठा खंडित होत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक, व्यापारी आणि शेतकरी प्रचंड त्रस्त झाले आहेत. या गंभीर समस्येवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून महावितरण प्रशासनाला थेट आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शहरात कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय दिवसातून अनेक वेळा तासनतास अघोषित वीज पुरवठा खंडित केला जात आहे. कडक उन्हाळ्याच्या दिवसांत वीज गुल होत असल्याने लहान मुले, वृद्ध आणि रुग्णांचे अतोनात हाल होत आहेत. वारंवार वीज जात असल्यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांचे धंदे कोलमडले असून आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. अनेक भागांत उघड्या डीपी (DP) आणि लोंबकळणाऱ्या वीज तारा दुरुस्त करण्याकडे महावितरण दुर्लक्ष करत आहे.

महावितरणच्या या मनमानी कारभाराविरोधात बोलताना शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील म्हणाले की, नागरिक जेव्हा तक्रारी घेऊन महावितरण कार्यालयात पान 3 वर

# महासमाधान शिबिरातून नागरिकांचे प्रश्न तात्काळ सोडवा

## — अपर विभागीय आयुक्त डॉ. प्रताप काळे





सेलू | प्रतिनिधी

सर्वसामान्य जनतेचे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महासमाधान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरांचा लाभ शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, दिव्यांग, विधवा, परित्यक्ता, निराधार महिला, अल्पसंख्याक, मागास प्रवर्ग तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात होणार असल्याचे प्रतिपादन अपर विभागीय आयुक्त डॉ. प्रताप काळे यांनी केले.

सेलू तहसील कार्यालयात महसूल विभागाच्या वतीने आयोजित महासमाधान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी अशा शिबिरांची पान 3 वर

# सरस्वती नदीवरील अर्धवट कॉम्प्लेक्स ठरत आहे पाण्यास अडथळा

## 10 वर्षापुर्वी बांधकाम,रिकामे गाळे बनले तळीरामांचा अड्डा





परळी (प्रतिनिधी) परळी शहरातील नदी-नाल्यांपैकी सर्वात मोठी आणि लांबी असलेल्या सरस्वती नदीपात्रावर नगरपालिकेने 10 वर्षापुर्वी दोन ठिकाणी बांधलेले व्यापारी संकुल अर्धवट अवस्थेत आहेत.पुराचे पाणी वाहुन जाण्यास मोठा अडथळा ठरत पान 3 वर

**• दहा वर्षापासुन अवस्था जैसे थे**

दहा वर्षापुर्वी नगरपालिकेने उभारलेले हे व्यापारी संकुल अर्धवट अवस्थेत असल्याने मोडकळीस आलेले आहे.याबाबत उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्याशी संपर्क साधला असता सदरील व्यापारी संकुल पाडण्याची किंवा गाळे विकण्याची कुठलीही प्रक्रिया सुरु नसल्याचे सांगितले.

**• नाला दाखवुन निधी लाटण्याचा प्रयत्न**



परळी नगरपालिकेने 2013-14 साली पवित्र सरस्वती नदीला नाला दाखवुन न.प.फंडातुन अंबेवेस व मिलिंद शाळेजवळ व्यापारी संकुल उभारण्याचे काम हाती घेतल्यानंतर यास आम्ही विरोध केला.शासनाला चुकीची माहिती देत हे व्यापारी संकुल उभारण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाल्यानंतर यास स्थगिती आली असुन सदरील व्यापारी संकुल नदीपात्रासारख्या चुकीच्या ठिकाणी आणि चुकीच्या पध्दतीने उभारल्याने भविष्यातही त्यास विरोध करणार

**• - जुगलकिशोर लोहिया,माजी नगराध्यक्ष,परळी**

# महाराष्ट्राची वास्तविकता बदलेल का?....

दीपक दुर्गे
संगणक विभाग,महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर



वास्तविकता म्हणजे जे खरे जे अस्तित्वात आहे आणि जे आपल्या अनुभवांमध्ये व ज्ञानामध्ये व इतरांचा जागतिक संबंधात आपली स्थिती या ची रुपरेषा म्हणजे वास्तविकता होय.

वास्तविकता ही कायमची पक्की गोष्ट नाही ती तंत्रज्ञान, कल्पना आणि माणसाच्या कृतीने घडत असते परंतु वास्तविकता बदलता येते पण ते इतके सोपे नाही वास्तविकता बदलण्यासाठी आपल्याला आपला दृष्टिकोन विचारात बदल केला पाहिजे व तसेच व्यवहारात पण बदल करणे गरजेचे आहे

आजची वास्तविकता पाहता जग हे तिसऱ्या महायुद्धाकडे वळत आहे का? तिसरा महायुद्ध " निश्चित घडेल" असं कोणीही मोठा तज्ञ किंवा संस्था सांगत नाही पण आज पाहता इराण इजराइल मध्ये भीषण युद्ध सुरु आहे त्यामुळे युद्धाची वास्तविकता ही एक अत्यंत भयंकर व विनाशकारी घटना आहे ह्या युद्धामुळे मानवतेचे, संपत्तीचे आणि पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे म्हणून ज्या देशात युद्ध सुरु आहे तेथील नागरिकांना हकनाक जीव गमवावे लागत आहे ह्या युद्धाची स्थिती बघता त्या देशांना आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागत आहे त्याचबरोबर त्याचा फटका इतर सर्व देशांना बसत आहे युद्धामुळे जसे इराण होऊन सर्व देशात कच्चे तेल निर्यातीवर बंदी त्याचा फटका सर्व देशांना बसने त्या देशांना तुटवडा जाणवत आहे त्यामध्ये आर्थिक टंचाई ( जसे महागाई वाढणे ) हे युद्ध थांबवले तरी तो कित्येक दिवस त्या देशाची परिस्थिती लवकर सुधारणार नाही कारण त्या देशाची भरपूर हानी झालेली असते आर्थिक चलन पूर्ववत येण्यासाठी कित्येक वर्ष संघर्ष करावा लागेल तेव्हा त्या देशाची परिस्थिती सुधारेल परंतु या दोन्ही देश युद्ध थांबवण्यास नकार देत आहेत कारण हे युद्ध बॉम्ब आणि क्षेपणास्त्राच नाही. अविश्वास, अस्तित्वाचा प्रश्न आहे. हे युद्ध थांबवायचा असेल तर ते फक्त "थांबा" म्हणून पुरेसं नाही शेवटी युद्ध थांबवण्याचा त्यासाठी पर्याय म्हणजे 1) गोळीबार थांबवावा लागेल.

2) तीस दिवसाची खिडकी-- ( वाटाघाटीची खिडकी ) यामध्ये तीस दिवसाची मुदत असते युद्धविराम झाल्यावर लगेच मोठा करार होत नसतो म्हणून लहान टप्प्यातील योजना हवी.

तीस दिवसाची वाटाघाटी खिडकी या काळात दोन्ही बाजू सैन्य मागे घेतात त्यामध्ये व्यापारी मार्ग तेल, अन्न, औषध पुन्हा सुरु शेवटी युद्ध कधीच "चांगलं" नसतं. त्यामुळे युद्ध सोपं आहे शांतता कठीण युद्ध हे नेते सुरु करतात पण किंमत जनतेला द्यावे लागते कोणताही पक्ष " आम्ही चुकीचे" आहोत म्हणत नाही म्हणून आट न ठेवता युद्धविराम हवा.....








# उपवर्गीकरणाचा प्रश्न : सामाजिक न्याय, प्रतिनिधित्व आणि नव्या चर्चेची गरज

**डॉ. भारत कऱ्हाड**



अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रश्न सध्या महाराष्ट्रासह देशभरात मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. काही ठिकाणी या निर्णयाच्या समर्थनार्थ भूमिका घेतली जात असताना अनेक सामाजिक संघटना, आंबेडकरी कार्यकर्ते आणि विविध समाजघटक त्याला विरोध करताना दिसत आहेत. बीडसारख्या जिल्ह्यांत हजारो नागरिकांचे मोर्चे निघत आहेत. या संपूर्ण चर्चेकडे केवळ राजकीय किंवा भावनिक प्रश्न म्हणून न पाहता सामाजिक न्याय, प्रतिनिधित्व, संधींचे वितरण आणि संविधानिक मूल्यांच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

भारतीय संविधानाने अनुसूचित जाती आणि जमातींना आरक्षणाच्या माध्यमातून सामाजिक आणि शैक्षणिक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. 2011 च्या जनगणनेनुसार देशातील अनुसूचित जातींची लोकसंख्या सुमारे 20 कोटींपेक्षा अधिक असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास 16.6 टक्के आहे. महाराष्ट्रातही अनुसूचित जाती प्रवर्गात सुमारे 59 जातींचा समावेश आहे. आरक्षणामुळे अनेक घटकांना शिक्षण, नोकरी, प्रशासन आणि राजकीय प्रतिनिधित्वाच्या संधी मिळाल्या; परंतु त्याचवेळी काही लहान आणि अतिमागास घटक अजूनही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिल्याची भावना वाढत गेली. याच पार्श्वभूमीवर उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे आला.

उपवर्गीकरणाचे समर्थक असा दावा करतात की आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. काही जातींना तुलनेने अधिक प्रतिनिधित्व मिळाले, तर काही समाजघटक अजूनही शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागे आहेत. त्यामुळे आरक्षणामध्ये अंतर्गत वाटप करून सर्वात वंचित घटकांपर्यंत न्याय पोहोचवणे आवश्यक असल्याचे त्यांचे मत आहे. सामाजिक समतोल राखण्यासाठी आणि आरक्षणाचा लाभ अधिक व्यापक करण्यासाठी हा उपाय आवश्यक असल्याचा युक्तिवाद समर्थकांकडून केला जातो.

मात्र विरोधकांची भूमिकाही तितकीच गंभीर आहे. त्यांच्या मते अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत विभागणी केल्यास सामाजिक ऐक्याला धक्का लागू शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समानतेच्या विचारांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जाते. आरक्षण हे सर्व अनुसूचित जातींसाठी समान अधिकाराचे साधन आहे आणि त्यात विभागणी केल्यास समाजात नवी दरी निर्माण होऊ शकते, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

या चर्चेतील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रतिनिधित्वाचा. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काही भाषणांमध्ये देशातील उच्च प्रशासकीय आणि निर्णयप्रक्रियेतील पदांवर सामाजिक प्रतिनिधित्वातील असमतोलाचा मुद्दा उपस्थित केला होता. लोकसभेतील भाषणात त्यांनी केंद्र सरकारच्या 90 सचिवांपैकी केवळ 3 सचिव ओबीसी समाजातील असल्याचा दावा केला होता. त्यांच्या मते देशाच्या मोठ्या अर्थसंकल्पावर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यवस्थेत बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. या वक्तव्यामुळे प्रशासन, नोकरशाही आणि सत्ताकेंद्रांमधील सामाजिक विविधतेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला.

खरंतर हा प्रश्न केवळ अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणापुरता मर्यादित नाही. खुल्या गटामध्येही संधींचे असमान वितरण हा गंभीर विषय आहे. काही आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या प्रभावशाली घटकांना शिक्षण, स्पर्धा परीक्षा, उद्योग, प्रशासन आणि संसाधनांमध्ये तुलनेने अधिक संधी मिळत राहतात, तर ग्रामीण आणि मध्यमवर्गीय युवक अजूनही संघर्ष करताना दिसतात. त्यामुळे "योग्य न्याय" ही संकल्पना केवळ आरक्षणापुरती मर्यादित न ठेवता शिक्षण, आर्थिक स्थिती, भौगोलिक पार्श्वभूमी आणि संधींची उपलब्धता यांच्याशी जोडून पाहण्याची गरज आहे.

अनेक सामाजिक अभ्यासकांच्या मते, उपवर्गीकरणासोबतच प्रशासन, शिक्षण, न्यायव्यवस्था आणि निर्णयप्रक्रियेत व्यापक सामाजिक प्रतिनिधित्व वाढविण्यावरही समान भर देणे आवश्यक आहे. देशातील निर्णयप्रक्रियेत कोणत्या समाजघटकांचे प्रमाण किती आहे, संधींचे वितरण कितपत संतुलित आहे आणि कोणते घटक अजूनही मागे आहेत, याची पारदर्शक आकडेवारी सार्वजनिक होणे आवश्यक आहे.

2011 च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींचा साक्षरता दर सुमारे 66 टक्के होता, जो राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. ग्रामीण भागात भूमिहीनता, बेरोजगारी आणि शैक्षणिक विषमता अजूनही मोठ्या प्रमाणावर दिसून येते. दुसरीकडे, नीती आयोग आणि इतर अभ्यासांनुसार सामान्य प्रवर्गातही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक अस्तित्वात आहेत. त्यामुळे सामाजिक न्यायाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनतो.

आज आवश्यकता आहे ती संघर्षापेक्षा संवादाची. कोणताही निर्णय घेताना सरकारने सर्व समाजघटक, अभ्यासक, कायदेतज्ज्ञ, सामाजिक संघटना आणि विविध प्रतिनिधींशी व्यापक चर्चा करणे आवश्यक आहे. समित्यांचे अहवाल, आकडेवारी आणि शिफारसी पारदर्शकपणे जनतेसमोर मांडल्या गेल्या पाहिजेत. सामाजिक प्रश्नांवर राजकीय फायद्यापेक्षा सामाजिक सलोखा अधिक महत्त्वाचा असतो.

समाजमाध्यमांच्या युगात अपूर्ण माहिती आणि भडकाऊ विधानांमुळे तणाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे संयम, विवेक आणि संविधानिक मूल्यांचा आदर राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. भारतीय समाजाची ताकद ही विविधतेत आहे. म्हणूनच कोणताही निर्णय घेताना सामाजिक न्याय आणि सामाजिक ऐक्य यांचा समतोल राखणे आवश्यक आहे.

उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ आरक्षणाचा विषय नाही; तो प्रतिनिधित्व, संधींचे वितरण, सामाजिक समता आणि लोकशाहीतील विश्वास यांच्याशी संबंधित आहे. त्यामुळे अंतिम उपाय संघर्षातून नव्हे, तर संवाद, आकडेवारी, पारदर्शकता आणि परस्पर विश्वासातूनच मिळू शकतो. समाजातील सर्व घटकांना न्याय देतानाच सामाजिक सलोखा टिकवून ठेवणे हेच खऱ्या अर्थाने लोकशाहीचे यश ठरेल.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,
वराडकर महाविद्यालय, दापोली,
जिल्हा रत्नागिरी.**

# शूरवीर शंभू राजे: 9 वर्षांच्या कार्यकाळात 120 युद्धे लढणारे

## (14 मे:छत्रपती संभाजी राजे जन्मोत्सव विशेष.)

छत्रपती संभाजी महाराज जयंतीचा 14 मे हा दिवस मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती आणि शिवपुत्र शंभूराजे यांचा जन्मोत्सव आहे. 14 मे 1657 रोजी पुरंदर किल्ल्यावर जन्मलेले संभाजी महाराज अजेय योद्धा, बहुभाषिक विद्वान (संस्कृत, फारसी, हिंदी) आणिक धर्मवीर व धर्मरक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांनी 9 वर्षांच्या कार्यकाळात 120 युद्धे लढली आणि एकही युद्ध न हरता स्वराज्याचे रक्षण केले. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी सदर प्रेरणादायक लेख प्रस्तुत करताहेत... संपादक.

छत्रपती संभाजी महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांनंतर मराठयांच्या गादीवर आलेले दुसरे छत्रपती होत. हौतात्म्यामुळे अजरामर झालेले एक पराक्रमी पुरुष. त्यांचा जन्म छ. शिवाजी महाराज व सईबाई यांच्या पोटी पुरंदर किल्ल्यावर (पुणे जिल्हा) झाला. त्यांना तीन वडीलबहिणी होत्या. सन 1659 मध्ये सईबाईंच्या अकाली मृत्यूनंतर त्यांचा सांभाळ आणि शिक्षण आजी जिजामातेने केले. सभासद व चिटणीसांच्या बखरींतून याविषयी तपशील आढळतात. केशवभट आणि उमाजी पंडित यांनी त्यांना उत्तम शिक्षण दिले. केशवभटांनी त्यांना दंडनीती व प्रयोगरूप रामायण ऐकविले. शिवाय राजपुत्रास आवश्यक असे घोड्यावर बसणे, शस्त्रविद्या, तालीम, तिरंदाजी वगैरेंचे शिक्षण दिले.

दि.27 ऑगस्ट 1680 रोजीच्या छ.संभाजींच्या दानपत्रावरुन त्यांच्या संस्कृत ज्ञानाविषयी माहिती मिळते. त्यांनी स्वतः लिहून घेतलेल्या तीन भागांतील बुधभूषण या गंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विविद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. यात राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, राजाचे सल्लगार, राजाची कर्तव्ये, राजसभा, मुख्य प्रधान राजपुत्र, त्यांचे शिक्षण, त्यांची कर्तव्ये, कोश, दुर्ग, सैन्य, हेर, नोकर, वगैरेंची माहिती दिली आहे. याशिवाय सन 1681 मध्ये गागाभट्टांकडून नीतिपर समयनय हा ग्रंथ (पोथी) त्यांनी लिहून घेतला आणि सन 1682 साली धर्म कल्पलता हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ केशव पंडिताने संभाजीराजांसाठी लिहिला. युद्धकलेतील नैपुण्याबद्दल ॲबे कॅरे या परकीय लेखकाने संभाजींची प्रशंसा केली आहे. सन 1665मध्ये संभाजीराजांचा विवाह पिलाजीराजे शिर्के यांची कन्या राजसबाईबरोबर झाला. पुढे तिचे नाव येसूबाई ठेवण्यात आले. येसूबाईपासून 1678 साली कन्या भवानीबाई आणि 1682 साली पुत्र शिवाजी ही दोन अपत्ये संभाजीराजांना झाली. चंपा ही त्यांची दुसरी राजपूत पत्नी. तिला माधोसिंग व उधोसिंग हे दोन मुलगे झाले. दुर्गाबाई ही आणखी एक पत्नी असल्याचा उल्लेख उत्तरकालीन कागदपत्रांत येतो. मे 1666मध्ये ते छ. शिवाजी महाराजांबरोबर आग्र्यास गेले होते. आग्र्याहून छ.शिवाजी महाराज संभाजीराजांसह बाहेर पडले पण वाटेत त्यांनी संभाजीराजांना मथुरेत ठेवले होते. पुढे ते 20 नोव्हेंबर 1666 रोजी राजगडास पोहोचले. संभाजीराजे मोगलांची मनसबदारी स्वीकारण्यासाठी 1667च्या उत्तरार्धात औरंगाबादला गेले व परतले. त्यांना इ.स.1671-74 दरम्यान राज्यकारभाराचा अनुभव यावा, म्हणून महाराजांनी महादजी यमाजी हा वाकेनिवीस दिला. सन 1672पासून त्यांनी प्रत्यक्ष लढाईत भाग घेतल्याचा उल्लेख आढळतो.

छ. शिवाजी महाराजांनी कर्नाटकच्या स्वारीवर जाताना नोव्हेंबर 1676 साली संभाजीराजांना श्रृंगारपूरला राहण्याची अनुज्ञा दिली कदाचित सावत्र आईच्या सहवासात त्यांना रायगडावर ठेवणे महाराजांना इष्ट वाटले नसावे. तिथे त्यांनी कलीची उपासना केली आणि नंतर 23 मार्च 1678मध्ये कलशाभिषेक करून घेतला. त्यानंतर छ. शिवाजी महाराज एप्रिल-मे 1678 दरम्यान कर्नाटकच्या स्वारीवरून परतल्यावर त्यांनी राजांना नोव्हेंबर 1678मध्ये सज्जनगडावर जाण्याचा आदेश दिला. तिथून संभाजीराजे एक महिन्याने दिनांक 13 डिसेंबर 1678 रोजी गडावरून मोगलाईत दिलेरखानाकडे गेले. दिलेरखानाने याचा फायदा घेऊन मराठी मुलखातील प्रदेश जिंकण्यास सुरुवात केली. दोघांनी काही गड घेतले. त्यात दि. 17 एप्रिल 1679 रोजी भूपाळगड जिंकला. त्यानंतर संभाजी व दिलेरखान काही ठाणी घेऊन, मंगळवेढे जिंकून विजापूरच्या बाजूस गेले. त्यांनी जालगिरी, तिकोटा, होनवड या मार्गाने अथणी गाठली. याच सुमारास दिलेरखान व संभाजी यांत मतभेद होऊन 21 डिसेंबर 1679 साली राजे गुप्तपणे स्वराज्यात पन्हाळ्यास आले.

छ. शिवाजी महाराजांच्या मृत्यूच्या वेळी- 3 एप्रिल 1680 रोजी राजे पन्हाळ्यावर होते. महाराजांच्या मृत्यूनंतर अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर दि.21 एप्रिल 1680 रोजी सोयराबाई आणि कारभारी मंडळातील काहींनी पुढाकार घेऊन राजारामांचे मंचकारोहण केले आणि छ.संभाजी महाराजांस पकडण्यासाठी हंबीरराव मोहिते व प्रल्हाद निराजी यांस पाठविले, पण तेच संभाजीराजांना पन्हाळ्यावर जाऊन मिळाले. छ.संभाजी महाराजांनी आपल्या विरोधातील हिरोजी फर्जंद, जनार्दनपंत हणमंते, मोरोपंत पिंगळे इत्यादींना कैदेत टाकले, तसेच अण्णाजी दत्तो व बाळाजी आवजी यांना अटक केली. दि.18 जून 1680 रोजी ते रायगडास पोहोचले आणि जुलैमध्ये त्यांनी स्वतःस मंचकारोहण करून पुढे दि.16 जानेवारी 1681 रोजी रायगड येथे विधिवत राज्याभिषेक करून घेतला. त्यावेळी मोरोपंत आदींना सोडले पण थोड्याच दिवसांत मोरोपंत मरण पावले, तेव्हा त्यांचा मुलगा निळोपंत यास मुख्य प्रधानपदी नेमले. नंतर काही दिवसांनी रायगडावर संभाजीराजांविरुद्ध आणखी एक कट उघडकीस आल्याने त्यांनी अण्णाजी दत्तो व बाळाजी आवजी, सोमाजी दत्तो आणि हिरोजी फर्जंद यांना परळीखाली कैद करून ठार मारले. याप्रमाणे आणखीही काही लोक मारले व कर्नाटकात शामजी नाईक पुंडे यास अटक केली. पूर्वीच्या कारभारी मंडळातील अनेक मंत्र्यांविषयी त्यांच्या मनात संशय होता, तेव्हा त्यांनी कवी कलश या कनौजी ब्राह्मणास जवळ करून त्यास छंदोगामात्य हे पद दिले, पुढे कुलअखत्यारही बनविले. राज्यकारभारातही त्याचा सल्ला ते प्रमाण मानीत होते. कवी कलशाचा संभाजीराजांवर मोठा प्रभाव पडलेला दिसतो. त्याच्या मर्जीनुसार ते अधिकारी बदलत किंवा नेमत असत . सोयराबाईही या सुमारास मरण पावल्या असाव्यात. त्यांच्या मृत्यूविषयी इतिहासतज्ज्ञांत मतैक्य नाही.

रायगडावर स्थिरस्थावर झाल्यानंतर संभाजीराजांचा बहुतेक काळ शत्रूच्या आक्रमणाला तोंड देण्यातच गेलेला दिसतो. त्यांची एकूण कारकीर्द नऊ वर्षांची त्या सबंध काळात सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, वाडीकर सावंत, दळवी यांच्याशी त्यांना मुकाबला करावा लागला. उत्तरेतील अत्यंत प्रबळ शत्रू औरंगजेब याच्याशी मुकाबला करीत असतानाच त्यांचा दि.11 मार्च 1689 रोजी अत्यंत क्रूररीत्या शेवट करण्यात आला, असे कळते.

!! छ.संभाजी महाराजांस त्यांच्या जन्मोत्सवानिमित्त विनम्र अभिवादन जी !!

**- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
(दिनविशेषकार)
मु. एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

# ह.भ.प.राजू लोखंडे महाराज यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित



बीड प्रतिनिधी दैनिक लोकनेता वर्धापन दिन आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा 2026महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेचा आणि सन्मानाचा पुरस्कार सोहळा...

मा.श्री. राजू महाराज लोखंडे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन त्यांच्या कार्यातून यशाची उल्लेखनीय भरारी घेत समाजात नवचैतन्य निर्माण करत आहात. आपल्या कार्याची प्रेरणा ही दीपस्तंभासारखी असून, समाजनिर्मिती आपण गेली आनेक वर्ष उल्लेखनीय व अलौकिक योगदान देत आहात.

आपल्या या कार्याची दखल घेऊन, रविवार दि.10 मे 2026 रोजी कार्य स्थळ : जिव्हीटी कृषीकुल सिरसाळा ता. परळी वैजनाथ जि. बीड

येथे मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार 2026 प्रदान करण्यात आला आहे.

दैनिक लोकनेता वर्धापन दिन आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा 2026 लोखंडे महाराज यांनी समाजातील अध्यात्मिक,धार्मिक व तर्कशास्त्रीय क्षेत्रात आगळेवेगळे व समाजोपयोगी कार्य करणारे ह.भ.प.राजू लोखंडे महाराज यांना लोकरत्न पुरस्काराने सन्मानित.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण दिघोळ ता.जामखेड येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. शालेय जीवनापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केले.पाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले.काही काळ वैराग्यमूर्ती ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत सेवा केल्यानंतर अध्यात्मिक साधनेला पूर्णतः वाहून घेतले.

ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तारखेच्या तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण ज्ञान आत्मसात केले.कोणताही ज्योतिषशास्त्राचा औपचारिक अभ्यास न करता केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तीची जन्मतारीख, वार तसेच जीवनातील संभाव्य घटना अचूकपणे सांगण्याची अद्भुत क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे.त्यांच्या अनेक भाकितांचा अनुभव आजवर खरा ठरलेला असून राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक राजकीय व सामाजिक अंदाज चर्चेचा विषय ठरले आहेत.विशेष म्हणजे नैराश्यात सापडलेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्यातील येणाऱ्या सकारात्मक क्षणांची जाणीव करून देत आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांपासून परावृत्त करण्याचे समाजकार्य महाराज सातत्याने करत आहेत. तसेच सामाजिक, अध्यात्मिक व पर्यावरण विषयक जनजागृतीचे कार्य अहोरात्र सुरु आहे.यापूर्वी त्यांना समाजरत्न पुरस्कार 14 नोव्हेंबर 2025 प्रदान करण्यात आला असून आता गंगाई–बाबाजी समाजभूषण पुरस्कार 2025 जाहीर झाल्याने त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव झाला आहे. लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोकरत्न पुरस्कार 2026, आता दैनिक लोकनेता वर्धापन दिन आयोजित राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल हभप राजू महाराज लोखंडे यांचे आ.सुरेश धस,उद्योजक परमेश्वर शेठ येवले इंदौर,शिवसेना उपजिल्हाप्रमुख व चराठा पंचायत समिती इच्छुक उमेदवार गणेश उगले,राजुरी जिल्हा परिषद गटाचे शिवसेना महायुती इच्छुक उमेदवार सतीश शेळके,लिंबागणेश जिल्हा परिषद गटाचे एनसीपी इच्छुक उमेदवार संजय पवार,यांच्यासह या पुरस्कार निवडीबद्दल सर्व स्तरातून हभप राजू महाराज यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अधिक मासानिमित्त संत जगमित्र मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन




परळी वैजनाथ (प्रतिनिधी ) येथील संत जगमित्र नागा मंदिर येथे अधिक मासानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले असून त्यामध्ये य संत तुकाराम महाराज गाथा पारायण कार्यक्रम होणार आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

काकड आरती,विष्णुसहस्रनाम, संत तुकाराम महाराज गाथा पारायण, धोंडे माहात्म्य कथा,तसेच धुपारती आणि हरिकीर्तन सायंकाळी 7ते 9 यावेळेत किर्तने होणार आहेत. ह. भ.प श्री राम महाराज गीते,ह. भ.प श्री विश्वनाथ महाराज घोडके, ह. भ.प श्रीसचिन महाराज गीते, ह. भ.प श्रीगंगाधर महाराज फड, ,ह. भ.प श्री कृष्णा महाराज गुट्टे, ह. भ.प श्रीसंजय महाराज तांबडे, ह. भ.प श्रीश्याम महाराज नेरकर यांचे तर पुजेचे कीर्तन दिनांक 23मे 2026 सकाळी 11ते 1 ह. भ. प.ॲड.दत्तात्रय महाराज आंधळे तर काल्याचे किर्तन दिनांक 24मे 2026 रोजी दुपारी 12ते 2 या वेळेत श्री.ह.भ.प संदिपान महाराज हासेगावकर यांचे होईल . या सप्ताहाचा प्रारंभ दि. 17मे 2026रोजी सकाळी 6वाजता श्री बाजीराव भैया धर्माधिकारी यांच्या हस्ते ग्रंथ पूजन होऊन होईल. या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा व संत तुकाराम महाराज गाथा पारायणाला भाविकांनी जास्तीत जास्त भाविकांनी बसावे असे आवाहन संत जगमित्र नागा मंदिर देवल कमिटी व परळी भाविक भक्त मंडळ परळी वैजनाथ तसेच श्रीहनुमंत नागरगोजे,श्री नागनाथ फडकेले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

# उष्णतेचा वाढता कहर

सध्या देशातील वातावरणातील बदलांमुळे तापमान सतत वाढत आहे.त्यामुळे हवामान विभागाने संपूर्ण देशात उष्णतेच्या वाता वरणाची शक्यता वर्तवली होती.एप्रिल महिना सर्वार्थाने संपुर्ण देशासह आपल्या महाराष्ट्राला तापदायक ठरला.प्रशांत महा सागरातील बदलामुळे उन्हाळा गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जास्त प्रमाणात असणार आहे, असे संकेत दिले होते. तसेच ' सुपर अल निनो ' मुळे जागतिक पातळीवर तापमानात वाढ शक्यता आहे, असे मत अमेरिकन हवामान अधिकाऱ्यांनी व्यक्त केले होते.त्याप्रमाणे देशाच्या उत्तर, दक्षिण भागासह महाराष्ट्रात उन्हाची तीव्रता दिवसें दिवस वाढत आहे. मार्च महिन्याच्या मध्यातच उन्हाच्या झळांनी आणि घामानी हैराण झाले आहेत. दरवर्षी महाराष्ट्रातील मराठवाड्यात आणि विदर्भात उष्णतेच्या लाटांचे तडाखे बसत असतात. यंदा तर मोठया प्रमाणात उष्णतेचे तडाखे बसले आहेत. अगदी मुंबई - कोकणा सारख्या किनारी भागात सुद्धा दमट पणामुळे अंगाची लाहीलाही होऊन अंगातून घामाच्या धारा वाहत आहेत. आतापर्यंतच्या उन्हाळ्यापैकी हा सर्वात मोठया उष्णतेचा प्रकोप म्हणावा लागेल. सन 2024 हे उष्णतेच्या इतिहासा तील सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले होते. त्यावेळी देशात अनेक ठिकाणी लोक मृत्युमुखी पडले होते. त्यानंतर 2025 मध्ये सुध्दा तशीच स्थिती होती. यंदा भारताच्या अनेक राज्यांसाह महाराष्ट्राच्या अनेक भागात सुद्धा कमाल तापमान 40 ते 45 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. जगातील उष्ण शहरांपैकी सर्वाधिक शहरे भारतात आहेत.यंदा उत्तर आणि मध्यपूर्वेतील भागात उष्णतेची लाट आली आहे.त्याचा फटका पंजाब, उत्तरप्रदेश, जम्मू -काश्मीर मध्यप्रदेश आदी राज्यांना बसला आहे .तेथील तापमान हे 40 अंश सेल्सिअसच्यावर आहे. देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद केली गेली आहे, ती वर्धा, अकोला, जालना ,जळगाव ,धुळे आदी भागांचा समावेश आहे. एप्रिलच्या 26 तारखेला अकोला येथे 46.9 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. अकोल्याची प्रयगराज नंतर देशातील दुसऱ्या आणि जगातील पाचव्या उष्ण शहराची नोंद झाली आहे. तर देशातील तिसरे आणि जगातील उष्ण राहिलेल्या अमरावती येथे 46 .8 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यावरुन उष्णता किती वाढली आहे याचा अंदाज येतो. वाढत्या उष्णततेमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. महाराष्ट्रात अकोला, वर्धा,लातूर, अहिल्या नगर, अशा काही ठिकाणी उष्माघातामुळे मृत्युमुखी पडले आहेत. लातूरमध्ये एका नऊ महिन्याच्या बालकाचा मृत्यू झाला, हे चिंताजनक आहे. तर आतापर्यंत 55 जण उष्मा घाताने आजारी पडले आहेत . उष्णतेचा फटका जसा मनुष्याला बसला आहे तसाच पशुपक्षी यानंही फटका बसला बसत आहे.

प्रत्येक उन्हाळ्यात उन्हाळ्याचे स्वरूपही अधिक तीव्र होत चालल्याचे पाहायला मिळत आहे. कारण तापमान केवळ वातावरणातील उष्णता वाढत नाही तर प्रचंड वेगाने बाष्पीभवन होते. त्यामुळे धरणातील पाणी कमी होते आणि पाणी टंचाई निर्माण होते. अनेक ठिकाणी पाणी टंचाई निर्माण झाली आहे. मुंबईसारख्या शहरात सुध्दा पाणी कपात करण्याची वेळ आली आहे.उष्णतेच्या लाटांबाबतीत जागतिक हवामान संघटनेचा अहवाल अतिशय महत्वाचा आहे. उष्णतेच्या लाटांमध्ये भारतीय शेतीसह जगभराचे मोठे नुकसान झाले आहे.अति उष्णतामानामुळे उन्हाळी पिके, बागायती शेतीला मोठा फटका बसला आहे.

उष्णतेच्या वेळी समुद्राची हवाही तापदायक ठरते. तापमानातील बदल मर्यादित राहत नाही, तर त्याचे माणसाच्या दैनंदिन जीवनात प्रकर्षाने जाणवू लागतात. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये तापमानाचा उद्रेक जाणवत असतो. अद्याप 'हिट वेव्ह ' स्थिती निर्माण झाली नाही. मात्र येत्या काही दिवसात तापमान वाढीचा धोका आहे. म्हणूनच हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेबबत मार्गदर्शक तत्वे व सूचना जाहीर केल्या आहेत .सूर्य प्रकाशात जास्त वेळ राहू नये. भरपूर प्रमाणात पाणी पिणे. शक्यतो सुती कपडे परिधान करावेत.लहान मुले वृद्ध आणि आरोग्याच्या समस्या असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. कारण उन्हाळ्यात उष्माघाताचा होण्याचा धोका वाढतो. सरकारने अनेक ठिकाणी उष्माघात कक्ष सुरु केले आहेत. परंतु सर्व यंत्रणांचे वेळीच योग्य प्रकारे नियोजन केले पाहिजे.

जागतिक पातळीवरील तापमानात वाढ, बेसुमार वृक्ष तोड , शहरातील काँक्रीटीकरण आणि ग्रामीण भागातील हरित क्षेत्राची झालेली घट यामुळे आपणच या संकटाला जबाबदार आहोत.तसेच हवामानात सतत बदल होत असून त्यामुळे कुठे अवकाळी पाऊस, कुठे गारपीट अशी संकटे वाढली



आहेत. उन्हाळ्यात आपल्याला वृक्ष सावली देतात. पण विकासाच्या नावाखाली वृक्षे तोडती जातात. तेथे पुन्हा वृक्ष लागवड करतो का? पृथ्वीवर हिरवळ हवी आहे त्यासाठी आवश्यक प्रयत्न केले पाहिजेत. अलीकडच्या काळात पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. जैवविविधतेचे सुद्धा संतुलन बिघडत असून प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. तेव्हा सर्वांनी समन्वयाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण निसर्गाचा समतोल आपणच बिघडत आहोत.त्याचेच परिणाम आपण भोगत आहोत.तेव्हा वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे. वृक्ष हे वातावरणातील संतलुन राखतात. खाणकाम आणि औद्योगिक प्रकल्पांसाठी जंगलतोड थांबवली पाहिजे .शहरांमध्ये हरित पट्टे निर्माण करण्याची सक्तीचे केले पाहिजे. कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष देणे.सर्वात महत्वाचे म्हणजे नागरिकांनी स्वतःची जीवनशैली बदलली पाहिजे. तापमान केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही तर तो मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. कारण या काळात स्वतःची काळजी स्वतः न घेतल्यास उष्णतेची लाट जीवघेणी ठरु शकते.

**- सुनील कुवरे, शिवडी, मुंबई**

## महाराष्ट्रातील या बँकेचा परवाना RBI कडून रद्द, ग्राहकांच्या पैशांचं काय होणार?



भारतीय रिझर्व्ह बँकेने मुंबईतील सर्वोदय को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे बँक परवाना रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रिय बँकने मंगळवारी सांगितले की ही कारवाई बँकेची कमजोर आर्थिक स्थिती, अपुरी जमापूंजी आणि भविष्यातील कामगिरी खराब होण्याची शक्यता असल्याने केली आहे. हा निर्णय 12 मे रोजी कामकाज संपल्यानंतर तात्काळ लागू करण्यात आलेला आहे.भारतीय रिझर्व्ह बँकेने एक निवदेन जाहीर केले असून त्यात ही मुंबईतील सर्वोदय को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड बँकींग रेग्युलेशन एक्टच्या नियमांचे पालन करण्यात अयशस्वी ठरली आहे. सध्याची बँकेची स्थितीत तिचे संचलन जारी ठेवणे खातेदारांच्या हिताचे नाही. लायसन्स रद्द झाल्यानंतर बँकने लागलीच तात्काळ प्रभावाने सर्व बँकींग सेवा बंद करण्याचे आदेश आरबीआयने दिले आहेत. ज्यात ग्राहकांकडून जमा रक्कम स्वीकारणे आणि ग्राहकांना पैसे देणे अशा दोन्हींचा समावेश करण्यात आला आहे.आरबीआयने महाराष्ट्र सहकारी समितीच्या रजिस्ट्रारना बँकेला बंद करण्याची प्रक्रिया सुरु करण्यास आणि एका लिक्विडेटरची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले आहेत. लिक्विडेटर बँकेची संपत्ती आणि देणीदारांचा निपटारा करेल. केंद्रिय बँकेच्या मते सध्या आर्थिक स्थिती बँक आपल्या जमाकर्त्या खातेधारकांना पैसे परत करण्याच्या स्थितीत नाही. मात्र, ज्या खातेधारकांची जमा रक्कम 5 लाख रुपयांपर्यंत आहे. त्यांचे पैसे डिपॉझिट इंश्योरन्स एण्ड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन (डीआयसीजीसी) अंतर्गत परत मिळणार आहेत.

## पान 1 वरुन

घेऊन निर्णय-प्रक्रिया राबविणे देशहितासाठी अत्यंत आवश्यक आहे." असे शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आवाहन केले आहे.सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारने अधिक संवेदनशीलता आणि व्यापक सल्लामसलत यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. यासोबतच प्रधानमंत्र्यांनी देशातील नामवंत अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि संबंधित तज्ज्ञांची तातडीने बैठक बोलावून परिस्थितीचा सखोल आढावा घ्यावा. पुढील धोरणांबाबत व्यापक विचारविनिमय करावा. देशातील जनतेमध्ये विश्वास आणि स्थैर्य निर्माण करणे, यालाच सद्यस्थितीत सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, अशी आमची ठाम भूमिका आहे, असे सांगायलाही शरद पवार विसरले नाहीत.

पाच राज्यांच्या निवडणुका आटोपताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या घोषणेने देशवासियांची काळजी वाढली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती भडकण्याची शक्यता वर्तवली जात आहेत. तर काही वस्तूंच्या किंमती महागण्याची भीती व्यक्त होत आहे. अशावेळी पंतप्रधानांच्या भूमिकेवर आता तीव्र राजकीय प्रतिक्रिया उमटत असल्याचे दिसते.

------------------------------------------

होती. आज त्यांनी वेळ दिल्यामुळे भेट घेतली. आजच्या बैठकीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सकाळी राष्ट्रीय कार्यकारिणी बाबत केलेले टिव्ट किंवा पक्षातील फुटीबाबत कोणतीही चर्चा झाली नाही. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले काम पुढे सुरु ठेवू, असेही तटकरे यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी नागरिकांना काटकसरीचे आवाहन केले, त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. या घोषणा अचानक करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्रात आणि गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. त्यामुळे सर्वपक्षीय बैठक घेऊन, तज्ज्ञांची बैठक घेऊन नागरिकांना विश्वास देऊन देशात स्थैर्य निर्माण करण्याची गरज आहे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी केली आहे.

-----------------------------------

विदर्भातील इतरही जिल्ह्याच्या तापमानात वाढ होण्याचा अंदाज आहे. विदर्भात मे महिन्यात तापमान 44 ते 46 अंशांपर्यंत नोंद होणं हे सामान्य आहे. राजस्थान, गुजरातच्या क्षेत्रात प्रति चक्रावत स्थितीमुळे विदर्भात कोरडी व उष्ण हवा वाहत असल्याने उष्णतेत वाढ झाली आहे, असं प्रवीण कुमार यांनी म्हटलं आहे.जळगाव जिल्ह्यात उष्णतेचा कहर पहायला मिळत आहे. पाचोरा, भडगाव आणि चाळीसगावात तापमान 44 अंशांवर पोहोचलं आहे. वाढत्या उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. उष्णतेच्या तीव्र झळांनी नागरिक हैराण झाले आहेत. दरम्यान जळगाव जिल्ह्यात पुढील दोन ते तीन दिवस उष्णतेची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर घराबाहेर पडताना काळजी घ्यावी असं आवाहान स्थानिक प्रशासनाच्या वतीने करण्यात आलं आहे.धुळे जिल्ह्याच्या तापमानाचा पारा 44 अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेमध्ये यावेळी हे तापमान चार अंशाने वाढलं आहे, त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं असून कृषी उत्पन्न बाजार समितीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. त्याचा आर्थिक पटका कृषी उत्पन्न बाजार समितीला बसत आहे.नाशिक शहरात दोन वर्षानंतर पहिल्यांदाच कमाल तापमानाने 42 अंशांचा टप्पा गाठला आहे. नाशिक शहरातील तापमान 40 शी पार गेले असून, आज शहरात तापमान 41 अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले आहे. नाशिकमध्ये या हंगामातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. दरम्यान हवामान खात्याकडून बुधवारपर्यंत नाशिकमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तीव्र उन्हाच्या झळा आणि रात्री होणाऱ्या असाह्य उकाड्याने नाशिककर हैराण झाले आहेत. शहरातील उष्णतेची लाट पुढील दोन दिवस कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.नंदुरबार जिल्ह्यात उष्णतेचा कहर दिवसेंदिवस वाढत असून, तापमानाचा पारा तब्बल 45 अंशांच्या आसपास पोहोचत आहे. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. अत्यावश्यक कामांशिवाय घराबाहेर पडू नये, त्यासोबत दुपारी 11 ते 3 या वेळेत उन्हात जाणं टाळावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात आलं आहे. उष्माघात आणि डिहायड्रेशन टाळण्यासाठी अधिक प्रमाणात पाणी, ओआरएस आणि लिंबूपाण्याचे सेवन करण्याचा सल्लाही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. तसेच या सर्व पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नगरपालिका आणि ग्रामपंचायतींमध्ये देखील उष्माघात कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे.

-----------------------------------

4:30 ते सायंकाळी 6:00 या वेळेत संपन्न होईल. सुदर्शन होम हा नकारात्मक ऊर्जा आणि जीवनातील अडथळे दूर करणारा अत्यंत प्रभावी वैदिक विधी मानला जातो. या मुख्य विधीनंतर जाहीर सत्संग आणि महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात प्रत्यक्ष उपस्थित राहून भाविकांना संकल्प सोडता येणार आहे. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी किंवा ऑनलाईन नोंदणीसाठी भाविक https://Vdst.in/e/77115 या संकेतस्थळाला भेट देऊ शकतात. 9860474821 9881270221, 9923287777 या क्रमांकांवर संपर्क साधू शकतात.

-----------------------------------

आवश्यकता असून नागरिकांना दारात सेवा देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी रोहिदेवी जाधव या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष मिलिंद सावंत, सभापती डॉ. संजय रोडे, तहसीलदार डॉ. शिवाजी मगर, नायब तहसीलदार विजय मोरे, उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय हरवडे, नायब तहसीलदार गजानन इनामदार तसेच सौ. निर्मला आवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

या महासमाधान शिबिरात नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. त्यामध्ये 7/12 उतारे, वारस फेरफार नक्कल, रेशन कार्ड, ई-केवायसी, ग्रीन कार्ड तसेच ग्रामपंचायतींचे दाखले वाटप करण्यात आले. तसेच बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरवही करण्यात आला.

यावेळी डॉ. संजय रोडे यांनी शेतकऱ्यांना पीकविमा, शेतरस्ते, पाणंद रस्ते, घरकुल, सिंचन विहिरी आणि सोलार पंप यांसारख्या विविध योजनांची माहिती देत लाभ घेण्याचे आवाहन केले.

अशी मागणी केली. नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांनी शहरातील पाणी पुनर्वापर प्रक्रियेसाठी शासनाने 38 कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती दिली. तसेच घरकुल योजना राबविण्यात सेलू नगर परिषद परभणी जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांनी केले. सूत्रसंचालन सुभाष मोहकरे यांनी तर आभार प्रदर्शन मंडळ अधिकारी सारिका हेगडे यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ग्राम महसूल अधिकारी ओम कानडे, विजय बोधले, प्रदीप पेंडलवार, हरिश टाक, स्वाती राऊत, अर्चना गायकवाड यांच्यासह महसूल कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

-----------------------------------

असलेले यातील रिकामे गाळे तळीरामांचा अड्डा बनले आहेत.याचा त्रास नागरीकांसह विद्यार्थी व महिलांना होत असुन यामुळे परिसरात चोरीच्या घटना वाढत आहेत.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभु वैद्यनाथ मंदिराबाहेर असलेल्या गायमुखातुन उगम पावलेल्या सरस्वती नदीवर 2015 साली परळी नगरपालिकेने बीओटी तत्वावर नाथ प्रतिष्ठानच्या मिलिंद शाळेजवळ आणि अंबेवेस अशा दोन ठिकाणी व्यापारी गाळे उभारले.नदीपात्रावर छत टाकुन या ठिकाणी गाळ्यांची निर्मिती करण्यात येत असल्याने याचा पुराचे पाणी वाहुन जाण्यास अडथळा निर्माण होत असल्याने नागरीकांनी यास कडाडुन विरोध केला.नदीपात्रावर छत टाकुन गाळ्यांची उभारणी ही पर्यावरण व इतर विभागांची परवानगी न घेता केली जात असल्याने या व्यापारी संकुलाचे काम रखडलेले आहे.आज दहा वर्षे उलटुनही या व्यापारी संकुलाचे काम अर्धवटच आहे.मिलिंद शाळेजवळील व्यापरी संकुलाशेजारुन किर्ती नगर, सावतामाळी नगर,कृष्णा नगर आदी भागांकडे तर अंबेवेस येथील व्यापारी संकलाशेजारुन नांदुरवेस,अंबेवेस,बंगला गल्ली,गोपनपाळे गल्ली आदी भागांना जोडणारा रस्ता जात आहे.रात्रीच्या वेळी या मोकळ्या गाळ्यामध्ये तळीरामांसह पत्ते व इतर अवैध धंदे सुरु असल्याने याचा त्रास महिला व विद्यार्थीनींना होत आहे.

-----------------------------------

एक डॉक्टर व एक परिचारिका यांच्यावर आतापर्यंत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात आणखीन कोणा कोणाचा सहभाग आहे हे पोलीस तपासानंतर स्पष्ट होऊ शकते. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ माजली होती.

-----------------------------------

जातात, तेव्हा जबाबदार अधिकारी जागेवर उपलब्ध नसतात. फोन केले तरी त्यांना योग्य उत्तरे दिली जात नाहीत. "महावितरणने आपला भोंगळ कारभार त्वरित सुधारावा आणि परळीतील वीज पुरवठा सुरळीत करावा. अन्यथा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या वतीने महावितरण कार्यालयावर तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल आणि अधिकाऱ्यांना जाब विचारला जाईल" असेही महादेव गंगणे म्हणाले.

परळीतील विस्कळीत वीज पुरवठा तातडीने पूर्ववत करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता शहरवासीयांकडून जोर धरु लागली आहे.

## पान 4 वरुन

अधिकाऱ्यांनाही पटल्याने त्यांनी बीडचे विषय वगळून केवळ गेवराई मतदारसंघातील विषयांवर बैठक आयोजीत केल्याचे नवीन पत्र काढले. या सर्व प्रकारामुळे मात्र बीड मतदारसंघावरील वर्चस्वाच्या मुद्यावरुन पंडित व क्षीरसागरांमध्ये सुप्त संघर्ष सुरु असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान दोन आमदारांमध्ये अशा पध्दतीने वर्चस्वावरून सुप्त संघर्ष सुरु असतांना अधिकाऱ्यांची मात्र पंचाईत होत आहे. विशेषत: नगर पालिकेच्या कामकाजात आ.पंडित यांचे लक्षत असते त्याठिकाणी ते वारंवार बैठका घेतांना दिसतात.

-----------------------------------

आत्मविश्वासही वाढत आहे. प्रत्येक तालुक्यात जाऊन या महिलांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून, हा उपक्रम आता राज्यासाठी एक 'रोल मॉडेल' ठरत आहे. 7 ऑगस्ट 2025 ला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आणि जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत या योजनेचा शुभारंभ झाला होता. आज या योजनेमुळे 770 आरोग्य साथी फडावर कार्यरत आहेत. मागील हंगामात जिल्ह्यातील 1075 ऊसतोड कामगारांना या महिलांनी उसाच्या फडावरच आरोग्य सेवा पुरवली आहे.

-----------------------------------

भागातील महिलांवर येत असायची. यावर उपाययोजना म्हणून शेकडोंनी टँकर सुरु करण्याची वेळ बीड जिल्हा प्रशासनावर यायची. केवळ टँकर सुरु करावे म्हणून आंदोलन, रस्ता रोको करण्याची वेळ ग्रामस्थांवर यायची, असे चित्र अनेकदा बीडकरांनी पाहिलेले आहे. गतवर्षीमात्र झालेल्या जोरदार पावसामुळे हे चित्र बदलले आहे. यावर्षी मे महिना अर्धा झाला तरी अद्यापपर्यंत एकही टँकर बीड जिल्ह्यात सुरु झालेले नाही.

वडवणी, अंबाजोगाई, केज, परळी, धारुर या तालुक्यातील चौतीस गावांमध्ये टंचाई जाणवत असल्याने परिसरातीलच विहीर अथवा बोअरचे अधिग्रहण करुन पाणीपुरवठा केला जात आहे. यासाठी प्रशासनाकडून 108 विहीर व बोअरचे अधिग्रहण करण्यात आले आहे. मे महिना अर्धा झाला असतांना बीडमध्ये टँकर सुरु नसल्याचे चित्र सर्वसामान्यांनाही दिलासादायकच आहे. वडवणी तालुक्यातील सहा गावांकरिता 29 बोअर, विहीर अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत. अंबाजोगाईच्या सहा गावांकरिता तेरा, केजच्या चौदा गावांकरिता 43, परळीच्या 2 गावांकरिता 2, धारुरच्या 6 गावांकरिता 21, अशा पद्धतीने 34 गावांकरिता 108 बोअर आणि विहिरींचे अधिग्रहण प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

-----------------------------------

दरवाजा उघडायला लावला. दरवाजा उघडताच पीडित मुलगी आणि तो वृद्ध घरात मिळून आले.प्रथमदर्शनी मुलीचे अंतर्वस्त्र फाडलेल्या अवस्थेत दिसल्याने आरोपीने तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले. नातेवाईकांनी तातडीने केज पोलीस ठाणे गाठून घडलेला प्रकार सांगितला.या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पीडित मुलीच्या नातेवाईकांच्या तक्रारीवरुन केज पोलीस ठाण्यात संबंधित नराधमाविरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (पॉक्सो) गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

-----------------------------------

सविस्तर चर्चा करण्यात आली. गावातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, वीज व्यवस्था तसेच नागरिकांच्या दैनंदिन अडचणी यावर सकारात्मक चर्चा झाली. ग्रामपंचायतीमार्फत सुरु असलेल्या विकासकामांचे बाळासाहेब चव्हाण यांनी कौतुक करत ग्रामपंचायत प्रशासनाने गावाच्या प्रगतीसाठी घेतलेल्या पुढाकाराचे अभिनंदन केले. तसेच घरकुल योजना, तांडा विकास, सामाजिक प्रश्न, शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे यासंदर्भातही चर्चा करण्यात आली. गावातील गरजू कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा तसेच विकासकामे अधिक गतीने पूर्ण व्हावीत यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

सोमनवाडी ग्रामपंचायत ही भाजप नेत्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खा. प्रितमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असून, ग्रामविकासाच्या दृष्टीने विविध विकासकामांना गती देण्यात येत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

दरम्यान, अंबाजोगाई पंचायत समितीचे नरेगा इंजिनियर आघाव यांचा देखील ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व मा. खा. प्रितमताई मुंडे यांच्या आदेशानुसार वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब उर्फ पप्पू चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेअंतर्गत तब्बल 95 घरकुल मंजूर करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

बाळासाहेब उर्फ पप्पू चव्हाण यांनी यावेळी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील विकासकामे प्रभावीपणे राबविण्यासाठी लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायत प्रशासनाने समन्वयाने काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य बाबुराव सोनवणे, गणेश सोनवणे, बळीराम तिडमिडे, मच्छिंद्र चाटे, रामभाऊ मुंडे, पप्पू उटले, बालाजी भोसले, विकास सुरवसे, अगंद चाटे, भारत केंद्रे, ग्रामरोजगार सेवक सुदाम चाटे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश सोनवणे यांनी केले तर आभार भारत केंद्रे यांनी मानले.

-----------------------------------

वेगवेगळे क्लासेस लावण्याची स्पर्धा सर्वत्र असताना लहानपणापासुनच अभ्यासात मग्र असलेल्या आयुषने मला कुठलाही क्लास नको फक्त अभ्यासाचे रिव्हीजनसाठी एखादा ऑनलाईन क्लास हवा अशी इच्छा व्यक्त केल्यानंतर वडिल मोहनराव आणि चुलते महावीर संघई यांनी आयुषला फिजिक्स वाला हा ऑनलाइन क्लास लावुन दिला. शाळेतील अभ्यासाला जोड म्हणुन आयुषने हा क्लास जॉईन केला परंतु यासाठी मोबाईल आवश्यक होता.आई सुवर्णाताई मोहन संघई यांनी आपला मोबाईल देत आयुषच्या अभ्यासाकडे लक्ष दिले.इयत्ता दहावीचा नुकताच निकाल लागला असुन यामध्ये आयुषने 95.40 टक्के गुण घेत परळी तालुक्यातुन प्रथम येण्याचा मान मिळविला.वर्षभर अभ्यास करत असताना आयुषने आपले वडिल व काकांचा व्यवसाय असलेल्या हेमा गिफ्ट सेंटर या दुकानावर जाऊन व्यवसायात मदत करत अभ्यासाचे योग्य नियोजन मोबाईलचा सकारात्मक वापर करत मिळवलेले यश हे कौतुकास्पद ठरत असल्याने आयुष व कुटुंबियांचे कौतुक होत आहे.

-----------------------------------

लक्ष्मीबाई झाशी(06:00), आग्रा कॅन्ट(10:45) मार्गे दुसऱ्या दिवशी दुपारी 14.30 वाजता निजामुद्दीन येथे पोहोचेल.

गाडी क्रमांक 07661 निजामुद्दीन–नांदेड विशेष रेल्वे दिनांक 25 मे 2026 रोजी निजामुद्दीन येथून रात्री 01.25 वाजता सुटेल आणि आग्रा कॅन्ट(04:30), वीरांगना लक्ष्मीबाई झाशी(09:35), राणी कमलापती(16:20), नागपूर(23:30), आदिलाबाद(05:05) मार्गे दिनांक 26 मे 2026 रोजी सकाळी 09.45 वाजता नांदेड येथे पोहोचेल.

गाडीची रचना : सदर विशेष गाडीत एकूण 22 डबे असतील – 18 द्वितीय श्रेणी शय्या(स्लीपर क्लास) डबे 2 सामान्य डबे 2 एसएलआर डबे प्रवाशांनी या विशेष रेल्वे सेवेचा लाभ घ्यावा तसेच प्रवासापूर्वी अधिकृत रेल्वे चौकशी प्रणालीद्वारे वेळापत्रक व आरक्षण स्थिती तपासून घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

-----------------------------------

त्यांनी सातत्याने संघर्ष केला. आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत निशिगंधानेही शिक्षणात सातत्य ठेवून हे यश प्राप्त केले.

फक्त शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते, हे निशिगंधाने सिद्ध करून दाखवले आहे. तिच्या या यशामुळे ओगले परिवारासह परळी शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. निशिगंधाच्या यशाबद्दल सर्व स्तरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, पुढील वाटचालीसाठी तिला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

-----------------------------------

त्यामुळे या सत्कार कार्यक्रमात विद्यार्थांना करीअर गाईडन्स सुद्धा करण्यासाठी तज्ञ मंडळीना पाचारण करण्यात येणार आहे. दहावीत ज्यांना कमीत कमी 75% गुण व बारावीत कमीत कमी( कोणत्याही शाखेत) 65% गुण प्राप्त असतील त्यांनी खाली दिलेला मो नं. वर अथवा त्या ठिकाणी संपर्क करावा व गुणपत्रिकेची झेरॉक्स जमा करावी.

गुणवत्ता प्राप्त विद्यार्थांना प्रमाणपत्र, ट्राफी व वस्तू स्वरुपात भेट देण्यात येणार आहे तसेच या सत्कार कार्यक्रमांस शिक्षण क्षेत्रातील नामांकित प्रमुख मार्गदर्शक व करिअर गाईड उपस्थित राहून विद्यार्थांना व पालकांना मार्गदर्शन करणार आहेत

तरी विद्यार्थ्यांनी मिलिंद विद्यालय तथा मिलिंद ज्यू कॉलेज परळी येथे रोज सकाळी 10 ते 11:30 यावेळेत प्रा विलास रोडे (9423714464), नितीन व्हावळे सर, प्रा दासू वाघमारे ( पंच शिलनगर) 8788027229, बाबासाहेब पाचांगे साहेब, (माधवबाग) 9595779780यांना संपर्क करून नाव नोंदणी करावी, किंवा फोनकरून नोंदणी करावी. ऐनवेळी नावे स्विकारली जाणार नाहीत.

तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी या सत्कार सोहळ्यास उपस्थित रहावून कार्यक्रम यशस्वी करावा व आपल्या यशाची गुरुकिली येथे सापडण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन संयोजक मंडळाने केले आहे.

-----------------------------------

व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून गुरुवारी (दि.14) धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन सकाळी आठ ते बारा करण्यात आले आहे. तसेच बुधवारी (दि.13) शांभवी क्लिनीकल लॅबच्या वतीने मोफत रक्ततपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्ट, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, शनैश्वर प्रतिष्ठान, तेली युवक संघटना, शनैश्वर महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. श्री शनी मंदिरात आयोजित अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्यास महिला व पुरुष भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून वैद्यनाथ मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

-----------------------------------

व चिकाटीमुळे हे यश मिळाल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी त्याच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे मत व्यक्त करण्यात आले.

-----------------------------------

# बीड मतदार संघातील वर्चस्वावरून पंडित-क्षीरसागरांमध्ये सुप्त संघर्ष

## आ.पंडितांचा बैठकांचा सपाटा; आ.क्षीरसागरांनी घेतला आक्षेप





बीड : बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदिप क्षीरसागर आहेत, त्यामुळे बीडमधील विविध प्रश्नांवर त्यांनीच आढावा घेणे अपेक्षित असतांना गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित हे बीडमध्ये वारंवार बैठका घेत आहेत. या सर्व प्रकारामुळे नाराज झालेल्या आ.संदिप क्षीरसागरांनी प्रशासनाकडे आक्षेप नोंदवताच प्रशासनाने बीडमधील विषय वगळुन नवे पत्र काढत त्यावर बैठक आयोजीत केली.

बीड नगरपालिका निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसने आ.विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली विजय मिळवला. तेव्हापासून आ.पंडित हे बीडच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. नगरपालिका तसेच जिल्हा प्रशासनाच्या स्तरावर ते बैठका देखील घेत असल्याचे यापूर्वी दिसले होते. दरम्यानच्या काळात आ.संदिप क्षीरसागर यांनीही या प्रकाराकडे दुर्लक्ष केले.

परंतु वारंवार अशा पद्धतीने बैठका घेतल्या जात असल्याने यावर आ.क्षीरसागरांनी थेट प्रशासनाकडे आक्षेप नोंदवला. सोमवार दि.11 रोजी बीड व गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांवर आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजीत केली होती.

ही बाब आ.संदिप क्षीरसागर यांना समजताच त्यांनी याबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे नाराजी व्यक्त केली. बीड मतदारसंघातील विषयांवर माझ्या उपस्थितीशिवाय बैठक कशी काय घेतली जाऊ शकते, असा सवाल आ.क्षीरसागरांनी उपस्थित केला. ही बाब आ.संदिप क्षीरसागर यांना समजताच त्यांनी याबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे नाराजी व्यक्त केली. बीड मतदारसंघातील विषयांवर माझ्या उपस्थितीशिवाय बैठक कशी काय घेतली जाऊ शकते, असा सवाल आ.क्षीरसागरांनी उपस्थित केला.

हा मुद्दा **पान 3 वर**

# कोयता सोडून धरली औषधपेटी! ऊसतोड महिला आता फडावरच्या 'डॉक्टर मॅडम'; बीड पॅटर्नचा राज्याला आदर्श



हातामध्ये कोयता आणि डोक्यावर उसाची मोळी, हे बीडच्या ऊसतोड कामगारांचे पारंपरिक चित्र आता पालटू लागले आहे. ज्या हातांनी आजवर फक्त ऊस तोडला, तेच हात आता फडावर जखमी मजुरांच्या जखमांवर मलमपट्टी करत आहेत. ऊसतोड महिलांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आल्यानंतर सुरु झालेली 'आरोग्य साथी' योजना आता स्थलांतरित मजुरांसाठी खऱ्या अर्थाने 'लाइफलाइन' ठरत आहे. फडावरील या महिलांची ओळख आता 'डॉक्टर मॅडम' म्हणून होऊ लागली आहे. ताप, अंगदुखी, मळमळ, उलटी, जुलाब, निर्जलीकरण (शोष) टाळणे, त्वचारोग, जखम निर्जंतुकीकरण, खाज, खाज सुटणे (खरुज), जखमा, पू येणे, जखम स्वच्छ करणे, जखम बांधणे, ताप मोजणे, पट्टी बांधणे आदी आजारांवर फडातच उपचार केले जात आहेत. या आजाराच्या गोळ्या आणि आवश्यक वैद्यकीय साहित्य त्यांना दिले आहे.

स्थलांतरामुळे ऊसतोड मजुरांचा सरकारी आरोग्य यंत्रणेशी संपर्क तुटत असे; मात्र आरोग्य साथींमुळे आता आरोग्य यंत्रणाच मजुरांच्या झोपडीपर्यंत पोहोचली आहे. यामुळे केवळ जीव वाचत नाहीत, तर मजुरांचा **पान 3 वर**

# चंद्रकांत प्रभाकरराव चव्हाण यांचे दु:खद निधन



परळी वैजनाथ येथील पदमावती गल्ली येथील रहिवासी स्व. चंद्रकांत प्रभाकरराव चव्हाण यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून चव्हाण परिवारावर शोककळा पसरली आहे.

ते मनमिळाऊ, शांत आणि सामाजिक जाणीव असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. व्यवसायाने ते आचारी होते.

त्यांच्यावर सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार दि. 12 मे सायंकाळी 06 वाजता शोकाकुल वातावरणात करण्यात आले.

स्व. चंद्रकांत प्रभाकरराव चव्हाण यांना ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो चव्हाण परिवारावर कोसळलेल्या दुःखात परळी संघर्षनेता परिवार सहभागी आहे.

# बीड जिल्हा मे महिन्यातही टँकरमुक्त!

## सरासरीपेक्षा अधिक पावसाचा परिणाम; 108 विहीर, बोअरचे अधिग्रहण




बीड : मार्च-एप्रिलमध्येच टँकरसाठी ओरड होणाऱ्या बीड जिल्ह्यात मेच्या मध्यापर्यंत एकही टँकर सुरु झालेले नाही. गतवर्षी सरासरीपेक्षा अधिकचा पाऊस झाल्याने हे सुखावह चित्र बीड जिल्ह्यात दिसत आहे. तर वडवणी, अंबाजोगाई, केज, परळी, धारूर या तालुक्यातील 34 गावांमध्ये टंचाई जाणवत असल्याने 108 विहीर व बोअरचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यात दरवर्षी पाणीटंचाईचा सामना सर्वसामान्यांना करावा लागतो. विशेषतः ग्रामीण भागात टंचाईची भिषणता अधिक असते. पिण्यासाठी आणि सांडपाणी म्हणून वापरण्यासाठी पाणीच नसल्याने पाच-सहा किलोमीटरवरुन डोक्यावर हंडे आणण्याची वेळ ग्रामीण **पान 3 वर**

# केज तालुक्यात साडेतीन वर्षाच्या मुलीवर 65 वर्षाच्या वृद्धाने केला लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न



केज : केज तालुक्यातील काळेगाव (घाट) येथे माणुसकीला काळिमा फासणारी एक घटना समोर आली आहे. एका 65 वर्षीय वृद्धाने साडेतीन वर्षांच्या चिमुकलीला घरात कोंडून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. 12 मे) सायंकाळी 5:00 वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. पीडित बालिकेची आई कामावर गेलेली होती, तर वडील घरी आजारी होते. यावेळी साडेतीन वर्षांची बालिका आणि तिचा पाच वर्षांचा भाऊ घराबाहेर खेळत होते.

या संधीचा फायदा घेत शेजारी राहणाऱ्या 65 वर्षीय आरोपीने चिमुकलीच्या भावाला खाऊ आणण्याच्या बहाण्याने दुकानावर पाठवले. त्यानंतर त्याने बालिकेला घरात बोलावून दरवाजाची कडी आतून लावून घेतली आणि तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. मुलगा दुकानातून परतल्यानंतर त्याला आपली बहीण दिसली नाही. त्याने ही माहिती तातडीने आपल्या वडिलांना दिली. वडिलांनी मुलीचा शोध घेतला असता शेजारच्या वृद्धाचे घर आतून बंद असल्याचे दिसले. संशय आल्याने त्यांनी आवाज देऊन **पान 3 वर**

# सोमनवाडी येथे गोविंद सोनवणे यांच्या उपस्थितीत

## वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब उर्फ पप्पू चव्हाण व नरेगा इंजिनियर आघाव यांचा सोमनवाडी ग्रामपंचायत कार्यालयात सत्कार






परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ.प्रितमताई मुंडे यांचे विश्वासू वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब उर्फ पप्पू चव्हाण यांनी नुकतीच सोमनवाडी ग्रामपंचायत येथे सदिच्छा भेट दिली. अंबाजोगाई पंचायत समितीचे नरेगा इंजिनियर आघाव यांचा गोविंद सोनवणे यांच्या उपस्थितीत सोमनवाडी ग्रामपंचायत कार्यालयात त्यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

सोमननवाडी ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवार दि. 12 मे रोजी सरपंच सौ. यमुनाबाई शिवाजी सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गोविंद सोनवणे यांच्या उपस्थितीत सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. बाळासाहेब उर्फ पप्पू चव्हाण व अंबाजोगाई पंचायत समितीचे नरेगा इंजिनियर आघाव यांचा सत्कार करून त्यांचे स्वागत केले. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत करत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

दरम्यान ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांबाबत **पान 3 वर**

# कुठलीही शिकवणी न लावता आईच्या मोबाईलवर अभ्यास करत आयुष ने मिळवला परळी शहरातुन प्रथम क्रमांक



परळी (प्रतिनिधी) युवा व किशोरवयीन मुलांच्या हाती मोबाईल आला की,रिल्स, इन्स्टाग्राम,फेसबुक असा सोशल मीडिया आणि ऑनलाईन गेम हे नित्याचेच मोबाईलच्या ऑनलाईन तंत्रज्ञानाचा फक्त आपल्या अभ्यासासाठी उपयोग करत आईच्या मोबाईलवर दोन तास ऑनलाईन आणि शाळेतील शिकवणीचे योग्य नियोजन लावत इयत्ता दहावीच्या परिक्षेत परळी शहरातुन प्रथम येण्याचा मान गणेशपार भागातील चि.आयुष मोहन संघई या विद्यार्थ्याने मिळवत विद्यार्थ्यांनी मोबाईलचा पॉझिटिव्ह वापर कसा करावा याचा आदर्श घालुन दिला आहे.

परळी शहरातील गणेशपार भागात दिगंबर जैन मंदिर समोरील रहिवासी मोहनराव संघई यांना आयुष आणि आगम ही दोन मुले.मोठा मुलगा आयुष हा शहरातील फाउंडेशन स्कुलमध्ये शिक्षण घेत यावर्षी दहावीची परिक्षा दिली.दहावी म्हटले की महागडे आणि प्रत्येक विषयाचे **पान 3 वर**

### दिवसातुन चार तास अभ्यास

शाळेव्यतिरिक्त आयुषने वर्षभर दररोज दोन तास ऑनलाईन शाळेतुन आल्यानंतर दोन तास अशा चार तास अभ्यासाचे नियोजन केले परिक्षा काळात पहाटे चार वाजता ऊठुन अभ्यास व रिव्हीझन दिल्याने हे यश मिळाले असुन यामध्ये काका महावीर,काकी मनिषाताई,आई सुवर्णताई,वडिल मोहनराव यांच्याबरोबरच शाळेतील शिक्षक गजानन नागझरे,राहुल गुट्टे,तोतला मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असुन भविष्यात पुणे येथे वाणिज्य शाखेत शिक्षण घेवुन सि.ए.बनण्याचा मनोदय आयुषने व्यक्त केला.

# उन्हाळी गर्दीच्या पार्श्वभूमीवर नांदेड–निजामुद्दीन–नांदेड विशेष रेल्वे चालविण्याचा निर्णय



उन्हाळी सुट्ट्यांमुळे होणारी अतिरिक्त प्रवासी गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने नांदेड–निजामुद्दीन–नांदेड दरम्यान विशेष रेल्वे चालविण्याचा निर्णय घेतला आहे. ही विशेष गाडी आदिलाबाद, पिंपळखुट्टी, नागपूर, राणी कमलापती, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी, आग्रा कॅन्ट मार्गे धावणार असून प्रवाशांना दिल्लीसाठी अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे.

विशेष गाडीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे :

गाडी क्रमांक 07660 नांदेड–निजामुद्दीन विशेष रेल्वे दिनांक 22 मे 2026 रोजी नांदेड येथून सकाळी 06.35 वाजता सुटेल आणि आदिलाबाद(10:00), नागपूर(15:55), राणी कमलापती(00:10), वीरांगना **पान 3 वर**

# शिक्षणाच्या जोरावर मिळवले यश; कु. निशिगंधा ओगलेची मंत्रालयात लिपिक पदावर निवड



परळी | प्रतिनिधी

परळीसारख्या शहरातून अत्यंत सामान्य परिस्थितीत शिक्षण घेत पुढे आलेल्या कु. निशिगंधा सिधू ओगले हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर महसूल विभागातील लिपिक पदावर निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.तीचे शिक्षण यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात नवी मुंबई वाशी येथे झाले आहे. उद्यापासून ती मंत्रालय, मुंबई येथे सेवेत रुजू होणार आहे.

निशिगंधाचे वडील सिद्धू उर्फ सिद्धार्थ ओगले हे मुंबईसारख्या मोठ्या शहरात गॅस टाकी सप्लाय करण्याचे काम करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. कुटुंबात आई रंजना सिधू ओगले,भाऊ निशिकांत सिधू ओगले आणि सगळ्यात छोटी बहीण निशिता सिधू ओगले असा परिवार आहे. कुटुंबाची परिस्थिती सर्वसाधारण असतानाही मुलीच्या शिक्षणासाठी **पान 3 वर**

# परळीत 18 मे रोजी दहावी/ बारावी पास गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा




परळी(प्रतिनिधी):- फेब्रु./ मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत विशेष प्राविण्यासह पास झालेल्या परळी शहरातील सर्व गुणवंत विद्यार्थांच्या दिनांक 18 मे 2026 रोजी परळी येथील लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिरात, सांय.5:30 वा सत्काराचे व करिअर गाईडन्स कार्यकमाचे आयोजन परळी भिमजयंती महोत्सव समिती व नालंदा फाऊन्डेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

दहावी व बारावी नंतर कोणत्या करिअर ऑपशन निवडाव्या, यासंदर्भात विद्यार्थी व पालक गोंधळलेले असतात किंवा अनभिज्ञ असतात, **पान 3 वर**

# उनाचा तड़का; नागरिक त्रस्त



महेंद्र गोदाम घाटनांदुर ग्रामीण प्रतिनिधी

अंबाजोगाई: तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा कडाका वाढला असून नागरिक हैराण झाले आहेत. दुपारच्या वेळी तापमानात मोठी वाढ होत असल्याने रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. कडक उन्हामुळे नागरिक घराबाहेर पडणे टाळत असून थंड पेय व फळांच्या लसी व रसांना मोठी मागणी वाढली आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि काम गार वर्गाला परम त्रास सहन करावा लागत आहे. दुपराच्या वेलेत बाजारपे थेही गर्दी कमी दिसुन येत आहे. शेतकरी , बांधकाम मजूर यानही उन्हाचा फटका बसत असुन कामच्या वेएट बदल करन्यात येत आहेत.

नागरिकांन भरपूर पानी घ्यावे, डोक्यावर टोपी किंवा रुमाल वापरन्याचा त्सेच अत्यावश्यक कामाशिवाय दुपारी बाहेर पडू नये,हवामान खात्याने पुढील काही दिवस उष्णतेची लाट रहन्याची शक्यता व्यक्ति केली आहे.

# श्री शनैश्वर जन्मोत्सव व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी श्री शनी मंदिरात रक्तदान शिबीर



परळी वैजनाथ दि.12 (प्रतिनिधी) श्री शनी मंदिरात रविवार (दि.10) पासून श्री शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त अखंड शिवनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात गुरुवारी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरास सहभागी होवून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विविध धार्मिक **पान 3 वर**

# मुप्टा बीड जिल्हा वतीने गुणवंत विद्यार्थी चि. अभिवादन जावळे यांचा गौरव



बीड | प्रतिनिधीएसएससी परीक्षा 2026 मध्ये चि. अभिवादन शशिकांत जावळे याने 82.20 टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल मुप्टा बीड जिल्हा वतीने त्याचा यथोचित सन्मान करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यात मुप्टा बीड जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्हाध्यक्ष (मा.) प्रविण तरकसे, प्रा. बाळासाहेब गव्हाणे, प्रा. सुनील मोरे, डॉ. शशिकांत गायकवाड, प्रा. नितीन भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी चि. अभिवादन जावळे याचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याच्या मेहनत, जिद्द **पान 3 वर**